# <u>फळसेवाडी हितकारी संस्था</u>
## विषेश सर्वसाधारण सभा

**दिनांक** : बुधवार 17 नोव्हेंबर 2010
**स्थळ** : शिरोडकर हायस्कुल, परेल

**उपस्थिती**

| | |
|---|---|
| 1. श्री मनोहर भिकाजी राणे | 8. श्री सुरेश रघुनाथ राणे |
| 2. श्री पांडूरंग सावजी राणे | 9. श्री गुरुनाथ धोंडू राणे |
| 3. श्री उदय भगवान राणे | 10. श्री उत्तम वामन राणे |
| 4. श्री हेमंतकुमार रमेश राणे | 11. श्री सुनिल सदानंद राणे |
| 5. श्री सुनिल विनायक राणे | 11. श्री आनंद नारायण साटम |
| 6. श्री अशोक दत्ताराम राणे | 13. श्री विनोद विठोबा राणे |
| 7. श्री अविनाश बाळकृष्ण राणे | |

फळसेवाडी हितकारी संस्थेची वार्षिक विशेष सभा बुधवार दिनांक 17 नोव्हेंबर 2010 रोजी शिरोडकर हायस्कुल, परेल येथे आयोजित करण्यात आली. सभेस 13 सभासद उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष श्री मंगेश मनोहर राणे तब्येत अस्वास्थमुळे अनुपस्थित असल्यामुळे संस्थेचे उपाध्यक्ष श्री पांडूरंग सावजी राणे हे अध्यक्षस्थानी विराजमान झाले. तसेच वयोवृध्द सभासद श्री मनोहर भिकाजी राणे यांना अध्यक्षांबरोबर स्थान देण्यात आले.

प्रथम अध्यक्ष व चिटणीसांनी उपस्थित सभासदांचे स्वागत केले व सन 2012 नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या. त्यानंतर सन 2007 वाडीतील दिवंगत नातेवाईक व सभासदांना दोन मिनीटे स्थब्ध उभे राहून श्रध्दांजली वाहण्यात आली. त्यानंतर रितसर कामकाजास सुरवात झाली.

1. प्रथम चिटणीसांनी सभेची विषयसूची वाचून दाखविली. त्यानंतर 10 फेब्रुवारी 2007 साली झालेल्या सभेचे इतिवृत्त वाचून दाखविले व इतिवृत्त वाचून मंजूर करण्यात आला.
2. सभेला विषयसुचीनुसार फळसेवाडी शाळा क्रमांक 2 या शाळेला 1 नोव्हेंबर 2010 रोजी 75 वर्षे पूर्ण झाली, त्यासंबधी या शाळेचा 75 वा अमृत महोत्सव कसा साजरा करावा याबद्दल सुचना व आदिवर चर्चा करण्यात आली. त्यानुसार ढोबळ मानाने खालील कार्यक्रम घेण्याचे ठरले.
   a. वयाची 75 वर्षे पुर्ण केलेल्या माजी विद्यार्थ्यांचा सत्कार तसेच विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा सत्कार करणे (उदा. मा श्री नारायणराव राणे साहेब)
   b. शाळेतील गुरुजी श्री फर्नांडिस यांच्या मदतीने चित्रकला, रंगावली व रक्तदान शिबीर आयोजित करावे
   c. यावेळी श्री सत्यनारायण महापूजा, रात्री भजन व दहिकाला आदि मनोरंजनाचे कार्यक्रम घेणे

3. ढोबळ मनाने सर्व माजी विद्यार्थी तसेच नोकरदार वर्गाची वर्गणी गोळा करण्यासाठी यादी तयार करणे व साधारणता रु.500/- वर्गणी घेऊन या वर्गणी मधुन हा कार्यक्रम करणे. या अमृत महोत्सवी कार्यक्रमामध्ये वरवडे-फळसेवाडी यांना सामाविष्ठ करण्यासाठी 9 जानेवारी 2012 रोजी शिरोडकर हायस्कुल, परेल येथे मिटिंग घेणे व याचे परिपत्रक तयार करण्याची जबाबदारी श्री अविनाश बाळकृष्ण राणे व श्री उत्तम वामन राणे यांच्यावर देण्यात आली. हे परिपत्रक दिनांक 25 डिसेंबर 2010 रोजी श्री सत्यविजय शिवराम राणे यांच्या मुलीच्या लग्नात वाटण्याचे ठरले. याला अनुसरून श्री विनोद विठोबा राणे यांनी मागील स्नेहसंम्मेलनाचा खर्च किती झाला त्यावरुन आपणांस पुढील खर्च कसा करावयाचा ते ठरविता येईल असे सांगितले व असा स्नेहसंम्मेलनाचा हिशेब आपण लोकांसमोर ठेवला आहे का ? हे विचारले. त्यावर चिटणीसांनी हा हिशेब चोख ठेवला होता व किती झाला हा परिच्छेद वाचून दाखविला त्यामुळे त्यांचे समाधान झाले.

अध्यक्षांच्या परवानगीने येणारे आयत्यावेळी विषय यावर चिटणीसांनी वाडीतील दररोजच्या समस्यांवर प्रकाश टाकला उदा. रस्ता, पाणी आदि. त्यासाठी माननिय ना. नारायणराव राणे साहेब (उद्योगमंत्री) यांची घेतलेली भेट तसेच श्री प्रकाश सावंत, सभापती, पंचायत समिती यांच्याशी केलेल्या चर्चेची माहीती सभाग्रसहास दिली व या सर्व समस्या सोडविण्यासाठी आपण सर्वानी सहकार्य करावे ही विनंती केली. तसेच माननीय नामदार श्री नारायणराव राणे यांचे चिरंजीव श्री नितेश राणे (स्वाभिमान संघटना) यांच्या निमंत्रणाची माहीती दिली व पत्रिका श्री मंगेश मनोहर राणे यांच्याशी संर्पक करावा असे सांगितले. तसेचे पिसेकामते विकास मंडळाच्या दिनांक 21 नोव्हेंबर 2010 रोजी झालेल्या मिटिंगची माहिती दिली. यावेळी असे ठरले की पिसेकामते विकास मंडळाचे पदाधिकारी बनताना गावामध्ये फळसेवाडी ग्रामस्थांना स्थान असावे याची जाणीव पदाधिकारयांना करून द्यावी व त्यानंतर पदे स्विकारावी. अश्या अनेक साधक बाधक विषयांवर चर्चा झाली.

यानंतर अध्यक्षांच्या वतिने श्री उत्तम राणे यांनी सर्वांचे आभार मानले व या कार्यक्रमाच्या चहापाण्याचा खर्च श्री हेमंतकुमार रमेश राणे यांनी केला त्याबद्दल त्यांचे आभार मानन्यात आले.

शेवटी उपस्थितांचे आभार मानुन राष्ट्रगीत होऊन सभा 7:30 वाजता संपली.

---